


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २३३, शनिवार १ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# गुलाल हमाराही है!

## नीलेश लंके यांचा ठाम विश्वास



■ चोंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आ. नीलेश लंके, आ. रोहित पवार, आ. नारायण आबा पाटील यांनी महापुजा करून अभिवादन केले.

चोंडी, जामखेड : प्रतिनिधी

**चार तारखेला प्रत्यक्षात काय चित्र असेल असा प्रश्न माध्यम प्रतिनिधींनी विचारला असता गुलाल हमाराही है असे उत्तर देत मा. आ. नीलेश लंके यांनी लोकसभा निवडणूकीत आपण विजयी होणार असा ठाम विश्वास व्यक्त केला.**

पुण्याश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जन्मस्थळी रात्री १२ वाजता मा. आ. नीलेश लंके, आ. रोहित पवार, आ. नारायण आबा पाटील यांनी महापुजा करून अहिल्यादेवींना अभिवादन केले. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आल्याने आसमंत उजाळून निघाला होता. महापुजेनंतर माध्यमांनी लंके, आ. रोहित पवार यांच्याशी संवाद साधला त्यावेळी लंके यांनी आपल्या विजयाचा दावा ठामपणे केला.

यावेळी बोलताना लंके म्हणाले, आहिल्यादेवी यांनी कायम लोकहिताचा दृष्टीकोन ठेऊन राज्यकारभार केला. त्यांच्या याच आदर्श मार्गावरून चालण्याची प्रेरणा कायम मिळत राहो. आहिल्यादेवींचा इतिहास पाहिला तर हिंदू धर्माची मंदिरे अतिशय चांगल्या पध्दतीची असल्याचे पहावयास मिळतात त्याचे सर्व श्रेय आहिल्यादेवी होळकर यांना जाते. आजचा दिवस सर्वसामान्य बहुजनांसाठी प्रेरणादायी दिवस असल्याचे लंके यांनी सांगितले.

दोन वर्षांपूर्वी शरद पवार चोंडी येथे आले होते. तुम्ही मोठया प्रमाणावर जयंती उत्सव साजरा केला होता. दोन वर्षापासून मात्र तुम्हाला मोठया प्रमाणावर जयंती उत्सव साजरा करता येत नाही. असा प्रश्न आ. रोहित पवार यांना विचारण्यात आला असता ते म्हणाले, यात राजकारण आणले जाते. आम्हीही ताकद लावू शकतो. आणखी एक स्टेज उभे करू शकतो. पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे काम खुप मोठे होते. अशा वेळी त्यांची जयंती दोन व्यासपीठावर होत असेल तर ते योग्य ठरणार नाही. उद्या आम्ही मोठया संख्येने लोक घेऊन आलो, त्यांचीही लोक आली त्यातून वाद निर्माण झाला तर पवित्र दिवसाचा अवमान होऊशकतो म्हणून काही गोष्टींकडे आम्ही दुर्लक्ष करतो. ज्या गोष्टींमध्ये उणीव आहे ती सरकारच्या माध्यमातून आम्ही भरून काढत असल्याचे पवार म्हणाले.

### लंकेंसह कार्यकर्त्यांना ठाम विश्वास

लोकसभा निवडणूकीत उडी घेतल्यानंतर नीलेश लंके यांनी आपण कमीत कमी दोन लाखांच्या मताधिक्क्याने विजयी होउ असा दावा केला होता. अखेरपर्यंत ते आपल्या दाव्यावर ठाम राहिले. आता निकालास काही दिवस बाकी असताना गुलाल हमाराही है असे सांगत लंके हे निवडणूकीतील आपल्या विजयावर ठाम आहेत. तर त्यांचे सहकारीही विजय लंके यांचाच होणार असल्याचे दावे करीत आहेत.

### काऊंटीग एजंटांना प्रशिक्षण

निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक बाबींवर लंके तसेच महाविकास आघाडीच्या नेत्यांचे बारीक लक्ष आहे. मतदान प्रक्रीया सुरू असताना काय काळजी घ्यायची याबाबत पोलींग एजंटांना सुचना देण्यात आल्या होत्या. मतदान झाल्यावर ईव्हएम मशिन सिल करून फॉर्म १७ सी ताब्यात घेतल्याशिवाय मतदान केंद्राबाहेर पडू नये अशा सक्त सुचना देण्यात आल्या होत्या. सर्व मतदान केंद्रांवरील फॉर्म १७ सी संकलीत करण्यात आले आहेत. मतमोजणीसाठी जाणाऱ्या एजंटांना नगर येथे प्रशिक्षण देण्यात आले त्यात असून ईव्हीएम सुरू केल्यानंतर कोणत्या गोष्टींची खातरजमा करायची याची सखोल माहीती देण्यात आली. काहीही झाले तरी संपूर्ण मतमोजणी पुर्ण होऊन ईव्हीएम मशिन गोदामात जाईपर्यंत मतमोजणी केंद्र न सोडण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

# मॅरेथॉन स्पर्धेने पुर्णवाद महोत्सवास प्रारंभ

■ ६ जुनपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन
■ दत्तमुर्ती स्थापनोत्सव व गुरू-शिष्य मेळाव्याचे आयोजन

पारनेर : प्रतिनिधी

**जगभरात विखुरलेल्या पुर्णवाद परिवाराच्या वतीने श्री. दत्तमुर्ती स्थापनोत्सव व गुरूशिष्य मेळाव्यानिमित्त ३१ मे ते ६ जुन दरम्यान पुर्णवाद महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून शुक्रवारी सकाळी ९ वाजता क्रीडा ज्योत प्रज्वलीत करून गुरूवाडा ते महाराज बागेदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या मॅरेथॉन स्पर्धेने या महोत्सवास प्रारंभ झाला.**



शुक्रवारी संध्याकाळी ६ ते ८ दरम्यान चहा पान व आरती झाल्यानंतर रात्री ८ ते १० पुर्णवाद परिवाराच्या वतीने कुलपोरहित वेदमुर्ती प्रकाश शास्त्री दंडगे यांचा मंत्र जागर व वैदिक सत्कार सोहळा पार पडला. बीड येथील अशोकराव वझे व नीलिमाताई वझे यांच्या वतीने वैदिक सत्कार व ज्येष्ठ पुजन करण्यात आले.

शनिवार दि. १ जुन रोजी सकाळी ८ ते ९ महिला व पुरूषांसाठी योगा आणि एरोबिक्स, सकाळी १० ते १२.३० अव्दैत व पूर्णाव्दैत या विषयावर प्रज्ञाकांत डॉ. प्रदीप चतुर्वेदी यांचे हिंदी व्याख्यान, दुपारी ३ वाजता वर्धिष्णू मल्लखांब चषक स्पर्धेचे अमरावती येथील विलास दलाल यांच्या हस्ते उदघाटन होईल. प्रात्यक्षिकांनंतर सायंकाळी ६ वाजेपर्यंत स्पर्धा पार पडेल. संख्याकाळी ७ ते ८ भारतीय आणि इतर खेळाविषयी माहिती व महाराजांच्या दर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.
रविवार दि. २ जुन सकाळी १० ते १२.३० पूर्णवाद स्पोर्टस ॲण्ड हेल्थ अकॅडमीच्या वतीन गोविंद देशपांडे यांना कै. सुधीरदादा जोशी स्मृती क्रीडा तपस्वी पुरस्काराचे वितरण होईल. छ. संभाजीनगरचे आयुक्त कृष्णाजी भोगे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष तर पद्मश्री उदय देशपांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थि राहणार आहेत. रात्री ८ ते १० पुर्णवाद अवॉर्डसचे वितरण होणार आहे.

सोमवार दि. ३ जुन रोजी सकाळी ८ ते ९ योगा आणि एरोबिक्स तसेच हॉलीबॉल, बास्केट बॉल आणि महिला क्रिकेट स्पर्धा, ह भ प मयुरेश बुवा केळकर यांचे सकाळी १० ते १२.३०दरम्यान किर्तन होईल.
दि. ४ जुन रोजी सकाळी १० ते १२.३० सुप्रिम कोर्ट ॲण्ड इटस अडमीनिस्ट्रेटीव्ह रिफॉर्मस या विषयावर भाग्येश पारनेरकर यांचे इंग्रजी व्याख्यान, दुपारी ३ ते ६ क्रीडा, रात्री ८ ते १० पंडीत शेखर कुंभोजकर यांच्या शास्त्रीय गायनाची संगीत मैफिल.
दि. ५ जुन रोजी सकाळी १० ते १२.३० दरम्यान प्रसिध्द लेखक व्दारकानाथ संझगिरी यांच्या अध्यक्षतेखाली ईश केला खेळ इर्षे पायी या विषयावर परिसंवाद, रात्री ८ ते १० पद्मश्री सुरेशदादा तळवलकर यांचा तालयात्रा हा सांस्कृतीक कार्यक्रम.
दि.६ रोजी सकाळी १० ते १२.३० प्रा. गुलजारसिंह रजपूत यांच्या उपस्थितीत अध्यक्षीय समारोप, दुपारी ३ वाजता शिवराम चषक कुस्ती स्पर्धेचे नगरसेवक पै. युवराज पठारे यांच्या हस्ते उदघाटन, रात्री ८ ते १० उस्मानखाँ यांचे सतार वादन व उस्मानखाँ यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान कार्यक्रम.

### धनराज पिल्ले यांच्या हस्ते उदघाटन

दि. ६ जुनपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवाचे उदघाटन दि. १ जुन रोजी रात्री ८ ते १० च्या दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. यावेळी पुर्णवाद सम्राट विद्यासागर ॲड. डॉ. विष्णू महाराज पारनेरकर यांची प्रमुख उपस्थिती असेल. भारतीय हॉकी संघाचे माजी कर्णधार धनराज पिल्ले यांच्या हस्ते महोत्सवाचे उदघाटन होईल. पूर्णवाद महोत्सव समितीचे कार्याध्यक्ष डॉ लक्ष्मीकांत पारनेरकर हे प्रास्ताविक करतील. राष्ट्रीय मॅरेथॉन रनर भूपेंद्र सिंग राजपूत हे प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी उपस्थित राहणार असून पूर्णवाद महोत्सव समितीचे प्रा. गुलजारसिंह राजपूत हे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविणार आहेत. यावेळी सरिता मिश्रा आणि संच समूह नृत्य सादर करतील.

### सोमवारी महाराजांचे आशीर्वचन

पूर्णवाद वर्धिष्णू विद्यासागर डॉ. विष्णूमहाराज पारनेरकर यांचे आशीर्वचन सोमवार दि. ३ जुन रोजी रात्री ८ ते १० दरम्यान होणार आहे. डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर यांनी पूर्णवादाची संकल्पना मांडून गुरू-शिष्य परंपरेच्या माध्यमातून काम केले. त्यानंतर डॉ. विष्णूमहाराज पारनेरकर ही परंपरा चालवत आहेत. दरवर्षी महाराजांचे आशीर्वचन ऐकण्यासाठी पूर्णवाद परिवारातील शिष्य मोठया संख्येने पारनेर येथे हजेरी लावतात.

# ...तर विधानसभा निवडणूकीत सर्व जागा लढवू

■ मनोज जरांगे पाटील यांचा इशारा ■ पुण्याच्या न्यायालयाचा जरांगे यांना दिलासा

पुणे: प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या तोंडावर मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी महत्त्वाची घोषणा केली आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण न मिळाल्यास विधानसभा निवडणुकीत सगळ्याच्या सगळ्या २८८ जागा लढवू, अशी घोषणा जरांगेनी पुण्यात केली. २०१३ मधील एका फसवणूक प्रकरणात जरांगे आज पुण्याच्या शिवाजीनगर न्यायालयात हजर झाले. त्या प्रकरणात न्यायालयाने जरांगेंना दिलासा दिला. त्यांच्या विरोधात ले अटक वॉरंट रद्द करण्यात आले. यानंतर न्यायालय परिसरात त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.**



मी जातीवाद करत नाही. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना पाडा इतकंच मी म्हणालो होतो. ४ जूनपासून मी पुन्हा एकदा आमरण उपोषणाला बसणार आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण न मिळाल्यास येत्या विधानसभा निवडणुकीत २८८ जागांवर उमेदवार उभे करणार असल्याची मोठी घोषणा जरांगे पाटलांनी केली. पाटील यांनी विधानसभेला उमेदवार दिल्यास सत्ताधाऱ्यांना त्याचा फटका बसू शकतो.

**कायद्यापुढे सगळे समान आहेत.**

कायद्यापुढे कोणीही मोठा नाही, असं जरांगे म्हणाले. सगळ्यांनी कायद्याचा सन्मान राखायला हवा. तारीख असल्याने न्यायालयात आलो होतो. माझ्यावर काहीच आरोप नाहीत. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे त्यावर काही बोलणार नाही. विनाकारण आरोप करणाऱ्यांच्या आरोपात उर्वरीत पान ३ वर

# मध्यप्रदेश काँग्रेसची निकालापूर्वीच जल्लोषाची तयारी !

■ १ क्विंटल लाडूची ऑर्डर ■ भोपाळसाठी रेल्वे तिकिट बुक

भोपाळ : वृत्तसंस्था

**लोकसभा निवडणूक अगदी शेवटच्या टप्प्यात आहे. १ जून रोजी सातव्या टप्प्याचे मतदान पार पडल्यानंतर ४ जून रोजी निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीनंतर पंतप्रधान मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान बनतील, असा विश्वास भाजपाकडून व्यक्त केला जातो आहे. तर देशात इंडिया आघाडीचं सरकार येईल, असं विरोधकांचे म्हणणं आहे. अशातच मध्यप्रदेश काँग्रेसने निकालापूर्वीची जल्लोषाची तयारी पूर्ण केली आहे. त्यासाठी १ क्विंटल लाडूची ऑर्डरही देण्यात आल्याची माहिती आहे.**

मध्यप्रदेशामध्ये लोकसभेच्या एकूण २९ जागा आहेत, त्यापैकी २७ जागांवर काँग्रेसने निवडणूक लढवली आहे. या निवडणुकीत काँग्रेसला १० पेक्षा जास्त जागा मिळतील, असा अंदाज वर्तवला जातो आहे. याशिवाय मध्यप्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जीतू पटवारी यांनीही काँग्रेसला



दुहेरी संख्येत विजय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

विशेष म्हणजे २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसला केवळ एका जागेवर विजय मिळवता आला होता. त्यापूर्वी २०१४ मध्ये काँग्रेसला केवळ २ जागा मिळाला होत्या. २०२३ च्या अखेरीस झालेल्या विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला होता. असे असतानाही आता काँग्रेसने यंदाच्या निवडणुकीत विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे. त्यासाठी काँग्रेसकडून जल्लोषाची तयारीदेखील सुरू करण्यात आली आहे. काँग्रेसने निकालाच्या दिवसासाठी १ क्विंटल लाडूची ऑर्डर दिली आहे. तसेच काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांनी भोपाळला पोहोचण्यासाठी रेल्वेचे तिकीटही बूक केले आहे.

यासंदर्भात बोलताना मध्यप्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते अब्बास हाफीज म्हणाले, मागील १० वर्षात भाजपाने लोकांच्या हिताची कामं केली असती, तर त्यांनी विजयाचा जल्लोष करण्याची आणखी एक संधी मिळाली असती, मात्र, आता ते शक्य नाही. मध्यप्रदेशमध्ये भाजपाचा पराभव निश्चित आहे. भाजपाने आता आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे. विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी आमच्या कार्यकर्त्यांनी भोपाळमध्ये पोहोचण्याची तयारी केली आहे. त्यासाठी त्यांनी रेल्वेच्या तिकीटही बूक केल्या आहेत. तसेच १ क्विंटल लाडूची ऑर्डरही देण्यात आली आहे. हा जल्लोष केवळ मध्यप्रदेशपुरता मर्यादित नसून देशभर होणार आहे. कारण देशात इंडिया आघाडीचे सरकार येणार आहे. उर्वरीत पान ३ वर






# चंदेरी



## अनुष्का प्रभासशी करणार नाही लग्न!

**४२ वर्षीय अनुष्का शेट्टी कन्नड चित्रपट निर्मात्याशी लग्न करणार आहे. अनुष्काची एंगेजमेंट झाली असून, लग्नाची तारीखही निश्चित झाल्याचा दावा करण्यात येत आहे. आतापर्यंत चाहत्यांचा अंदाज होता की अनुष्का शेट्टी बेस्ट फ्रेंड प्रभासला डेट करत आहे.**

बाहुबलीची देवसेना अर्थात अनुष्का शेट्टीबद्दल आलेली बातमी चाहत्यांना धक्का बसवू शकते. विशेषतः जे चाहते प्रभाससोबत तिच्या लग्नाचे स्वप्न पाहत आहेत त्यांच्यासाठी ही बातमी दुःखदायक ठरू शकते. अनुष्का शेट्टी अभिनेता प्रभाससोबत नव्हे तर कन्नड चित्रपट निर्मात्याशी लग्न करणार असल्याच्या बातम्या येत आहेत. लग्न या वर्षाच्या अखेरीस होणार आहे. अनुष्का आणि प्रभास खूप चांगले मित्र आहेत आणि त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. बाहुबली मालिकेत प्रभास आणि अनुष्काची जोडी सर्वांनाच खूप आवडली होती आणि तेव्हापासून त्यांच्या प्रेमसंबंधाच्या बातम्या येऊ लागल्या. त्याच्या लग्नाचीही चर्चा सुरू झाली होती. न्यूज ९ लाईव्हच्या रिपोर्टनुसार, ज्या प्रोड्यूसरसोबत अनुष्का लग्न करणार आहे तो ४२ वर्षांचा आहे आणि अनुष्काही ४२ वर्षांची आहे. प्रभास आणि अनुष्काबद्दल बोलायचे झाले तर तेलुगू चित्रपटसृष्टीतील हिट जोडी मानली जाते. या जोडीला खऱ्या आयुष्यातही एकत्र पाहण्याची चाहत्यांना नेहमीच इच्छा होती. काही वर्षांपूर्वी एका मुलाखतीत अनुष्का शेट्टीने प्रभाससोबतच्या अफेअरच्या बातमीवर म्हटलं होतं, की प्रभास माझा असा मित्र आहे ज्याला मी पहाटे ३ वाजताही कॉल करू शकते. आमची नावे अनेकदा एकमेकांशी जोडली जातात. कारण आम्ही विवाहित नाही. मात्र आमच्यात असं काही झालं असतं तर ते आतापर्यंत बाहेर आलं असतं. प्रभासनेही यावर प्रतिक्रिया दिली होती. त्याच्यात अन् अनुष्कात काहीही नसल्याचे त्याने सांगितले होते. प्रभासने असेहह सांगितले होते की, तो आणि अनुष्का दोन वर्षे इतका दीर्घ काळ आपले नाते लपवू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या डेटिंगच्या बातम्या केवळ अफवा आहेत.

## पुष्पा २ रिलीज होण्यापूर्वी मोठा धक्का!

### संपादक अँटनी रुबेनने सोडला चित्रपट

**अल्लू अर्जुनच्या पुष्पा 2 : द रुल या चित्रपटाची प्रत्येकजण आतुरतेने वाट पाहत आहे. हा चित्रपट 15 ऑगस्टला स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर प्रदर्शित होत आहे. मात्र आता चित्रपटाच्या प्रदर्शनाला केवळ 89 दिवस उरले असताना संपादक अँटनी रुबेन यांनी चित्रपट सोडल्याची चर्चा आहे.**



तारखा न मिळाल्याने हा सर्व प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. अशा परिस्थितीत पुष्पा २ पुन्हा पुढे ढकलला जाईल की काय, अशी भीती चाहत्यांना लागली आहे. मात्र, हे काम सातत्याने सुरू असून हा चित्रपट १५ ऑगस्टलाच चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असल्याचे चित्रपटाच्या टीमचे म्हणणे आहे. अँटनी रुबेन सध्या वरुण धवनच्या बेबी जॉन या अॅटली निर्मित चित्रपटाच्या संपादनात व्यस्त आहेत. तो या चित्रपटाचा सहनिर्माताही आहे. अशा परिस्थितीत त्याला पुष्पा २ साठी वेळ काढता आला नाही. अँटोनी रुबेन यांनी यापूर्वी पुष्पा : द राइज, जवान, बिगिल, मेर्सल आणि विवेगम सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांचे संपादन केले आहे. रुबेन गेल्यानंतर दिग्दर्शक सुकुमार आणि अल्लू अर्जुन यांच्या अडचणी काहीशा वाढणार असल्याचं उघड आहे. चित्रपट किती चांगला बनवला जातो यात शेवटी सर्वात मोठी जबाबदारी त्याच्या संपादकाची असते. तो चित्रपटातील अनावश्यक दृश्ये काढून टाकतो आणि कथा पडद्यावर एका दमदार पद्धतीने सादर करतो. पुष्पा २ ची टीम आता राष्ट्रीय पुरस्कार विजेते संपादक नवीन नूली यांना सोबत आणण्याच्या तयारीत असल्याचे समजते. नवीनने यापूर्वी सुकुमारसोबत जूनियर एनटीआरच्या नन्नाकू प्रेमाथो (२०१६) आणि राम चरण स्टारर रंगस्थलम (२०१८) मध्ये काम केले आहे. त्याने २०२० मध्ये रिलीज झालेला अल्लू अर्जुनचा तेलुगू ब्लॉकबस्टर अला वैकुंठापुरमुलू संपादित केला आहे. तथापि, नवीन नूलीकडे सध्या पवन कल्याणचा तेलुगू गँगस्टर थ्रिलर, ओजी देखील आहे, जो या वर्षी सप्टेंबरमध्ये प्रदर्शित होणार आहे. दुसरीकडे, या सर्व चर्चेदरम्यान, पुष्पा २ च्या टीमशी संबंधित लोकांनी हिंदुस्तान टाइम्सला सांगितले की, चित्रपटाचे प्रदर्शन ठरल्यानुसारच होईल. चित्रपटाचे काम आपल्या गतीने सुरू असल्याचे सांगण्यात आले. अहवालात म्हटले आहे की, अल्लू अर्जुन या महिन्यात चित्रपटाचे शूटिंग पूर्ण करेल आणि उर्वरित शूटिंग जूनपर्यंत पूर्ण होईल. त्यामुळे चित्रपटाला विलंब होण्याची शक्यता नाही.





## देवावर विश्वास आहे, पण कर्मकांडावर नाही...

### मधुने सांगितल्या आयुष्यातील रोचक गोष्टी !, फिटनेसचेही राज केले उघड...

**बॉलिवूड अभिनेत्री मधू (वय ५५) सध्या कर्तम भुगतम या चित्रपटामुळे चर्चेत आहे. श्रेयस तळपदेसोबत ती या चित्रपटात दिसणार आहे. याआधी तिने फूल और कांटे सारखा सुपरहिट चित्रपट आणि रोजासारख्या अविस्मरणीय चित्रपटात काम केले आहे. त्याद्वारे लोकांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. मधु बऱ्याच दिवसांनी बॉलिवूडमध्ये पुन्हा परतली आहे. कर्तम भुगतममध्ये श्रेयस तळपदेही हृदयविकाराच्या झटक्यानंतर पहिल्यांदाच पडद्यावर दिसत आहे. या अनुषंगाने झालेल्या एका विशेष मुलाखतीत त्यांच्याकडून जाणून घेतले की त्यांनी हिंदी चित्रपटांपासून दूर होण्याचे कारण काय ? त्याचं पुनरागमन कसं झालं ? आणि बरेच काही ? वाचा ही खास मुलाखत...**

***रोजा चित्रपटात दिसत होतात, अगदी तसेच आजही सुंदर आणि फिट दिसत आहात. या फिटनेसचे रहस्य काय आहे ?***

- *मधु : मी कमी अन्न खातो. आता आपली संस्कृती अशी झाली आहे की आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांना आणि मित्रांना दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण किंवा चहासाठी भेटतो. भूक नसली तरी तुम्ही जेवत राहा, पण माझा मंत्र आहे, की कमी खा. साधे जीवन जगा. मी सूर्यास्तानंतर जेऊ नये हा जुना नियम पाळते. मी रोज विश्रांती, योगा आणि चालणेदेखील करते. चार दिवस भरपूर डाएट किंवा व्यायाम केला आणि मग कंटाळा आल्यावर सोडून दिले असं करू नका. माझा सातत्यावर विश्वास आहे. मी दररोज माझ्या आहाराची आणि व्यायामाची काळजी घेते. त्याचाच हा परिणाम आहे.*

- फूल और कांटे सारख्या सुपरहिट चित्रपटातून तू बॉलिवूडमध्ये पदार्पण केलेस. रोजा सारखा हिट चित्रपट केला. मग ती अचानक हिंदी चित्रपटांतून का गायब झाली ?
- मधु : खरं तर, मी एकाच वेळी पाच भाषांमध्ये काम करत होते. त्यामुळे कधी-कधी तारखांमुळे मला जास्त चित्रपट करता येत नव्हते, पण मी १९९१ ते १९९९ पर्यंत सतत काम केले. मी अभिमानाने सांगू शकते की मी कधीही घरी रिकामी बसली नव्हती. मी देवाच्या कृपेने खूप व्यस्त होते. मी हिंदीत जास्त काम केले नाही. याचे कारण मी एकाच वेळी पाच उद्योगांमध्ये काम करत असल्याने मला पाच वेगवेगळ्या भाषांमध्ये विभागले गेले. आजही प्रत्येक इंडस्ट्रीतील लोक मला वेगळ्या चित्रपटासाठी ओळखतात. नंतर मी इंडस्ट्रीतून ब्रेक घेऊन कुटुंबाला वेळ देण्याचा निर्णय घेतला होता.
- **आता कर्तम भुगतम या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये परतण्याचा निर्णय कसा घेतला ?**
- मधु : खरं तर, मला आता अभिनय करायचा नाही असा विचार करून काही वर्षांसाठी इंडस्ट्रीतून ब्रेक घेतला. मला माझ्या कुटुंबासोबत वेळ घालवायचा होता. तेव्हा मला समजले की मी एक अभिनेता आहे आणि नेहमीच अभिनेता राहीन. त्यामुळे त्या भावनेने मी पुन्हा चित्रपट करायला सुरुवात केली. आता मला आणखी काम करायचे आहे. मला या इंडस्ट्रीत राहायचे आहे. कारण मला ते आवडते. जेव्हा सोहम शाहने मला कर्तम भुगतम ऑफर केली आणि मला त्याची कथा आवडली तेव्हा मी त्याला हो म्हटलं.
- **कर्तम भुगतम् हे ज्योतिष आणि ग्रहांच्या हालचालींबद्दल आहे. या गोष्टींवर तुमचा किती विश्वास आहे ?**
- मधु : जे म्हणतात की तुमचा सध्या चांगला वेळ नाही. जर तुम्ही मला पैसे दिले तर मी हे विधी करू शकतो,



पूजा करू शकतो. तर मला ते पटत नाही. ते मी अजिबात करत नाही. मला वाटत नाही की कोणीही माझे भविष्य अचूकपणे सांगू शकेल आणि कोणीही पूजा करून माझे भाग्य बदलू शकेल. मात्र, मी नशिबावर विश्वास ठेवते. माझा देव किंवा विश्वाच्या शक्तीवर विश्वास आहे. पण कर्मकांडावर विश्वास नाही.


- **९० च्या त्या काळात, अभिनेत्रींना बहुतेक ग्लॅमर म्हणून नृत्य आणि गाण्यासाठी ठेवले जात असे. इंडस्ट्रीमध्ये हिरोईनचे स्थान काळाबरोबर मजबूत झाले आहे यावर तुमचा विश्वास आहे का ?**
- मधु : माहीत नाही. त्यावेळीही मी सर्व प्रकारच्या भूमिका केल्या. मला एक चांगली अभिनेत्री म्हणून ओळख मिळाली. ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट होती. कारण जेव्हा मी चित्रपटांमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केला तेव्हा मी चांगली अभिनेत्री होऊ शकत नाही असे सांगून नाकारण्यात आलं होतं. एखाद्या मुलीने आपल्या करिअरला सुरुवात करण्यापूर्वी अशी गोष्ट ऐकली तेव्हा तिला धक्का बसतो. त्यामुळे, त्यानंतर मी अभिनय, नृत्य, शब्दलेखन शिकून पूर्णपणे तयार होऊन परत आली. जेव्हा मला तू एक चांगली अभिनेत्री असल्याचे सांगण्यात आले तेव्हा मला हा माझा विजय वाटला. मी चांगली अभिनेत्री आहे की ग्लॅमर स्टार आहे हे मी कधी पाहिले नाही. मी दोन्ही प्रकारची कामे केली. मी शॉर्ट स्कर्ट घालून डान्सही केला आहे आणि साडी नेसून वेणी बांधण्याचे सीनही केले आहेत.
- **अजय देवगणच्या करिअरची सुरुवात तू केलीस.** त्यांच्यासोबतही मनापासून भावना. नंतर, तुम्ही त्याच्या किंवा इंडस्ट्रीतील कोणाच्या संपर्कात होता का ?
- मधु : माझी अडचण अशी आहे की मी कोणाशीही संपर्क ठेवत नाही. एखादी गोष्ट मला स्वतःमध्ये बदलायची असेल तर ती म्हणजे ही सवय. ती मी बदलतही आहे. मला आता ज्यांची आठवण येते, त्यांना कॉल करते. बोलते. माझे जुने मित्र किंवा ओळखीचे कोणी कुठे दिसले तर मी जाऊन त्यांना नमस्कार करते. मी स्वतःमध्ये हे बदल आणत आहे, जे मी यापूर्वी केले नव्हते. मी याआधी कधीच कोणाच्या संपर्कात राहत नव्हती.

### कर्तम भुगतमची काय आहे स्टोरी ?

थ्रिल, ड्रामा आणि सस्पेन्सने भरलेली ही कथा देव (श्रेयस तळपदे) न्यूझीलंडहून भारतात आल्यापासून सुरू होते. देव त्याच्या वडिलांची संपत्ती ताब्यात घेण्यासाठी भोपाळला आला आहे. बालपणीच आई गमावलेल्या देवचे संगोपन वडिलांनी केले. देवच्या वडिलांनी त्याला शिक्षण देऊन सक्षम बनवले. नंतर परदेशात नोकरीसाठी पाठवले. कोविड आला आणि त्याच दरम्यान त्याच्या वडिलांचे निधन झाले. देव त्यांना शेवटचाही भेटू शकला नाही. देवच्या वडिलांची इच्छा होती की त्याने नोकरी सोडून स्वतःचा व्यवसाय सुरू करावा. त्यासाठी त्यांनी कोट्यवधी रुपये जमा केले होते. आता वडिलांच्या निधनानंतर देव घरी परतला आहे. १० दिवसांत संपत्ती आणि पैशाची प्रकरणे पूर्ण करून परदेशात परतण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. पण त्याचे प्रत्येक काम कुठे ना कुठे अडत चालले आहे. याचदरम्यान देव अण्णांना (विजय राज) भेटतो. अण्णा म्हणजे माणसाचा हात धरून त्याची कुंडली सांगणारी व्यक्ती. अण्णांच्या बोलण्याने प्रभावित होऊन देव पूजा आणि ज्योतिषावर विश्वास ठेवू लागतो. त्याचं कामही हळूहळू होऊ लागतं. पण काही महिन्यांनंतर देवला अशा परिस्थितीचा सामना करावा लागतो ज्याची त्याने कल्पनाही केली नसेल. असे का झाले हा चित्रपटाचा सर्वात मोठा ट्विस्ट आहे.

## पैशांमुळे अनिल कपूरने सोडला 'हाऊसफुल ५'


अनिल कपूरने अक्षय कुमारचा बिग बजेट चित्रपट हाऊसफुल ५ सोडल्याची बातमी आहे. साजिद नाडियाडवालाला अनिल कपूरने मागितलेली फी योग्य वाटली नाही, असे वृत्त आहे. वेलकम आणि वेलकम बॅक या चित्रपटानंतर नाना पाटेकर आणि अनिल कपूर ही हिट जोडी हाऊसफुल ५ मध्ये दिसणार होती. चाहतेही खूप उत्सुक होते.



अनिल कपूरचा निर्माता साजिद नाडियादवाला यांच्यासोबत फीसवरून वाद झाला होता. हाऊसफुल ५ मध्ये अक्षय कुमार, रितेश देशमुख आणि अभिषेक बच्चन यांच्यासोबत नाना पाटेकर आणि अनिल कपूर यांनाही घेतले होते. त्यामुळे चाहत्यांच्या आनंदाला सीमा नव्हती आणि ते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते. पण ताज्या बातमीने त्याचे मन मोडले आहे. मिड डेच्या वृत्तानुसार, साजिद नाडियादवाला आणि अनिल कपूर यांच्यात पैशांवरून बिनसले. अनिल कपूरने मागितलेल्या फीस साजिद नाडियाडवाला सहमत नव्हते. त्यामुळे निर्माते नाना पाटेकर यांच्या व्यक्तिरेखेवर नव्याने काम करत असल्याचे बोलले जात आहे. त्याची व्यक्तिरेखा पुन्हा लिहिली जात आहे. आता अनिल कपूरच्या भूमिकेसाठी अर्जुन रामपालसोबत चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र निर्मात्यांकडून अद्याप काहीही सांगण्यात आलेले नाही.

## शर्मीन सेगलने सांगितले लठ्ठपणामुळे आलेले अनुभव

**अभिनेत्री शर्मीन सेगलने विशेष मुलाखतीत तिला लठ्ठपणाबद्दल आलेल्या अनुभवांबद्दल सांगितले. शाळेच्या दिवसात ती खूप जाड होती आणि त्यामुळे तिची खिल्ली उडवली गेली. हिरामंडीच्या सेटवर भन्साळी तिच्याशी कसे वागायचे हेही शर्मीनने सांगितले.**



प्रसिद्ध चित्रपट निर्माते संजय लीला भन्साळी यांची भाची आणि अभिनेत्री शर्मीन सेगल सध्या हिरामंडी या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. या मालिकेत शर्मीनने मनीषा कोईरालाची मुलगी आलमजेबची भूमिका साकारली आहे. मात्र, शर्मीनला तिच्या अभिनयातील कमतरतेमुळे सोशल मीडियावर टीकेचा सामना करावा लागत आहे. पण शर्मीनला अशा परिस्थितीचा सामना करण्याची ही पहिलीच वेळ नाही. शर्मीनने सांगितले की, शालेय जीवनात जाड असल्यामुळे तिला खूप गुंडगिरीला सामोरे जावे लागले. तिने तिचे मामा संजय लीला भन्साळी यांच्याबद्दल देखील सांगितले. तिला फक्त त्यांची भाची व्हायचे नाही तर चित्रपटांमध्ये नाव कमवायचे आहे, असे ती म्हणाली.

शर्मीन म्हणते, की मी शाळेत असताना खूप लठ्ठ होती. लठ्ठपणाशी लढा देणेदेखील एक ताकद आहे. ते वास्तव स्वीकारणे, त्यावर काम करणे आणि अभिनेता बनणे या प्रवासात मी माझ्याबद्दल इतके शिकले की माझा सर्वात कमजोर क्षण माझा सर्वात मजबूत क्षण बनला, असे ती म्हणाली. संजय लीला भन्साळी यांच्या मालाल चित्रपटातून डेब्यू करणारी शर्मीन त्यांच्या दिग्दर्शनाखाली हिरामंडीमध्ये काम करत होती. अशा परिस्थितीत भन्साळींनी सेटवर दिग्दर्शक म्हणून किती आणि काका म्हणून कशी वागणूक दिली, यावर शर्मीन म्हणाली, की मी दहा वर्षांपासून त्यांच्यासोबत असिस्टंट म्हणून काम करत आहे. त्यामुळे काका आणि संजय सरांमधील फरक माझ्या मनात अगदी स्पष्ट आहे. मला त्यांच्याबद्दल खूप आदर आहे. कारण त्यांनी आयुष्यभर चित्रपटांसाठी काम केले आहे.



## शॉर्ट न्यूज

### वारंवार खंडित वीजपुरवठ्यामुळे पुणतांबेकर त्रस्त

■ **पुणतांबा :** गेल्या दोन-चार दिवसांपासून विनाकारण सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे पुणतांबेकर त्रस्त झाले असून त्यांचे जनजीवन सुद्धा विस्कळीत झालेले आहे. पुणतांबा येथे गेल्या दोन-चार दिवसांपासून कोणतीही पूर्वसूचना न देता विनाकारण सकाळी, दुपारी तसेच रात्री तीन ते चार तास विद्युत पुरवठा खंडित करण्यात येत आहे. उन्हाळ्यात तापमान व उष्णतेमुळे नागरिक अगोदरच हैराण झालेले आहे. सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे पुणतांबेकर त्रस्त झाले आहेत.

### कोल्हार उपबाजारात गहू २७५१ रुपये क्विंटल

■ **राहाता :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोल्हार बुद्रुक येथील उपबाजारात गव्हाची ११ क्विंटल आवक झाली. गहू कमीत कमी २६०० रुपये तर जास्तीत जास्त २७५१ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. गहू सरासरी २६५० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. तसेच कोल्हार उपबजारात सोयाबीनची १ क्विंटल आवक झाली. सोयाबीन सरासरी ४५११ रुपये क्विंटल दराने खरेदी करण्यात आली. मक्याची १ क्विंटल आवक झाली. मका सरासरी २२२५ रुपये क्विंटल दराने खरेदी करण्यात आला.

### आमदार जितेंद्र आव्हाड यांचा निषेध

■ **संगमनेर :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पोस्टर फाडणाऱ्या आमदार जितेंद्र आव्हाड यांचा संगमनेर येथे भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करीत तीव्र निषेध नोंदवला. यावेळी भाजपाचे शहराध्यक्ष श्रीराम गणपुले, अमोल खताळ, मनसेचे शरद गोरडे सहित पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रकरणी आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### विजेच्या तारांना बांबू कामटींचा आधार

■ **नेवासा :** तालुक्यातील मुळाथडी परीसरासह पानेगाव येथे वीज वाहक तारांना बांबू कामटीचा आधार घेऊन सध्या वीज पुरवठा सुरू आहे. विद्युत केबल टाकण्याचे काम गेल्या ३ महिन्यांपासून बंद असून ते काम सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. खांब व वीजवाहक तारा जुन्या झाल्याने कमकुवत झाल्या आहेत. काही खांबांना जमिनीपासूनच गंज धरल्याने ते धोकादायक झाले आहेत. विद्युत तारा अनेक ठिकाणी खाली आल्या असून त्यांना बांबूच्या कामटी बांधून आधार दिला आहे. सध्या वादळी वारे वाहू लागल्याने तारा तुटून अपघात होण्याची शक्यता आहे.

### व्यापाऱ्यांपुढे ऑनलाइन व्यवसायाची स्पर्धा

■ **नगर :** शहराचा विस्तार झपाट्याने वाढत असल्यामुळे लोक वस्ती मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे. त्यामुळे नव-नवीन बाजारपेठा तयार होत असतात. शहराचे पहिले उपनगर सावेडी असून या ठिकाणी चांगली बाजारपेठ निर्माण झाली आहे. बाजारपेठ म्हणजे फक्त व्यवसाय नसून या ठिकाणी रोजगार निर्मिती होत असते. अनेक तरुण-तरुणी या ठिकाणी काम करत आहे. सर्वांच्या सहकार्यातून व्यापारी करणाला चालना मिळत असते. नवनवीन बाजारपेठा निर्माण होणे गरजेचे आहे. असोशियन ग्राहक आणि व्यवसाय यामधील दुवा आहे असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

# श्रीगोंद्यात दहावीच्या निकालात मुलींनीच मारली बाजी!

## येळपणे गटात सहा शाळा शंभर नंबरी

देवदैठण : प्रतिनिधी

**राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने घेतलेल्या दहावी परीक्षेचा ऑनलाईन निकाल नुकताच जाहीर झाला. यामधे श्रीगोंदा तालुक्यातील येळपणे गटातील सहा शाळांचा निकाल शंभर टक्के लागला असून बहुतांश शाळांत बारावी पाठोपाठ दहावीच्या निकालातही " बाई पण भारी देवा " म्हणत मुलांपेक्षा मुलीच अग्रेसर असल्याचे तर मुलांच्या गुणांना मात्र वाळवी लागल्याचे दिसून आले.**

एरंडोली येथील सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयातील २८ पैकी २८ विद्यार्थी उत्तीर्ण होत दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यामधे प्रज्ञा भरत इथापे हिने ९०.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अंकिता संतोष इथापे हिने ८६.४० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला तर वैष्णवी संतोष गावडे हिने ८५.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला असल्याची माहिती मुख्याध्यापक साहेबराव काळे यांनी दिली.

निंबवी येथील श्री.भैरवनाथ विद्यालयातील २६ पैकी २६ विद्यार्थी उत्तीर्ण होत दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यामधे वैष्णवी विठ्ठल गोंटे हिने ९१ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. प्रिती सुनिल भोसले हिने ८७.४० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. तर स्नेहल संतोष गावडे हिने ८७.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला असल्याची माहिती मुख्याध्यापक तुकाराम खोसे यांनी दिली.

येवती येथील श्री खंडेश्वर विद्यालयातील २५ पैकी २५ विद्यार्थी उत्तीर्ण होत दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यामधे वैष्णवी विठ्ठल दिवटे हिने ८२.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. शंभूराज पांडुरंग दिवटे याने ८२.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला तर प्रणाली संतोष ढवळे हिने ७९.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला असल्याची माहिती मुख्याध्यापक महादेव शिर्के यांनी दिली.

देवदैठण येथील संस्कार ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सचा १०० टक्के निकाल लागला. यामधे स्नेहा कैलास घेगडे हिने ८८.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तृप्ती गोविंद ढवळे हिने ८३.४० टक्के गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक मिळविला. तर तनुजा नवनाथ बनकर हिने ८०.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविल्याची माहिती मुख्याध्यापक संजय कौठाळे यांनी दिली.

अरणगाव दुमाला येथील श्री.मिरावली माध्यमिक



■ ९८.२० टक्के गुण मिळवून श्रीगोंदा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या अनुष्का सुनिल थोरात हिचा सत्कार करताना मार्गदर्शक शिक्षक केशव कातोरे, योगेश खामकर आणि सतिश खामकर (छायाचित्र - दीपक नि. वाघमारे - देवदैठण)

विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला. यामधे साकिब करीम शेख हिने ७७.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कावेरी सुरेश शिंदे हिने ६८.४० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला तर निलेश राजेंद्र आढाव याने ६६.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविल्याची माहिती मुख्याध्यापक शिवाजी उदार यांनी दिली.

कोरेगव्हाण येथील कोरेश्वर विद्यालयचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यामधे ओम अरूण आढाव याने ८९.४० टक्के गुण मिळवुन प्रथम क्रमांक पटकाविला. सार्थक राहूल नरोडे याने ७९.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला तर ओंकार सुनिल नरोडे याने ७० टक्के गुण मिळवुन तृतीय क्रमांक मिळविल्याची माहिती मुख्याध्यापक रमजान सय्यद यांनी दिली.

येळपणे येथील श्री खंडेशवर माध्यमिक विद्यालयातील ८४ पैकी ८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून दहावीचा निकाल ९८.८० टक्के लागला. यामधे शिवम संभाजी शितोळे याने ९५.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. स्नेहल नानासाहेब पवार हिने ९२ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला तर शुभम संदिप धावडे याने ९०.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला असल्याची माहिती मुख्याध्यापक संजय पवार यांनी दिली.

देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील १६१ पैकी १५७ विद्यार्थी उत्तीर्ण होताना दहावीचा निकाल ९७.५१ टक्के लागला आहे. ओम सुरेश ढवळे याने ९५ .४० टक्के गुण मिळवुन प्रथम क्रमांक पटकाविला. जयदीप राहुल वाळुंज याने ९३ .८० टक्के गुण मिळवुन द्वितीय क्रमांक मिळविला तर श्रावणी पांडुरंग कौठाळे हिने ९२ .६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. तसेच क्रीडा व चित्रकला विषयात ५४ विद्यार्थ्यांना ग्रेस गुणांचा लाभ मिळाला असल्याची माहिती मुख्याध्यापक बाळासाहेब दहिफळे यांनी दिली.

राजापूर येथील महात्मा गांधी विद्या मंदिर शाळेचा दहावीचा निकाल ९५.४५ टक्के लागला असून २२ पैकी २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. यामधे कृष्णा बाळू मोरे याने ७३.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. दिव्या संदिप धावडे हिने ७१.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला तर आनंद हरीभाऊ जगताप याने ७१ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला असल्याची माहिती मुख्याध्यापक दत्तात्रय इथापे यांनी दिली.

उक्कडगाव येथील श्री मुंजोबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९५.३४ टक्के लागला असून ४३ पैकी ४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. यामधे सार्थक विजय कातोरे व कृष्णा सोमनाथ गोलांडे या दोघांनी ९०. ४० टक्के समान गुण मिळवुन संयुक्तरित्या प्रथम क्रमांक पटकाविला. प्रतिक तुकाराम कातोरे याने ८९.८० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला. तर विराज नितीन बांगर याने ८४.६० टक्के गुण मिळवुन तृतीय क्रमांक मिळविला असल्याची माहिती मुख्याध्यापक भाऊसाहेब शितोळे यांनी दिली.

पिंप्री कोलंदर येथील पद्मभूषण वसंतदादा पाटील विद्यालयातील २८ पैकी २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा दहावीचा निकाल ९२.८५ टक्के लागला आहे. यामधे आकांक्षा राजू कळसकर हिने ८८.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. पूजा दत्तात्रय भोंडवे हिने ८४ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला तर स्वरांजली वाल्मिक पखाले हिने ७७.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला असल्याची माहिती मुख्याध्यापक बाळासाहेब जठार यांनी दिली.

म्हसे येथील म्हसे माध्यमिक विदयालयाचा दहावीचा निकाल ८९.७९ टक्के लागला आहे. ४९ पैकी ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यामधे समिक्षा खंडेराव पठारे हिने ९१.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तनुजा अप्पा देविकर हिने ८७.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला तर ज्ञानेश्वरी हनुमंत देविकर हिने ८६.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला असल्याची माहिती मुख्याध्यापक बिभीषण परकाळे यांनी दिली.

ढवळगाव येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयाचा दहावीचा निकाल ८६.९५ टक्के लागला असून २३ पैकी २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यामधे सानिया शब्बीर पठाण हिने ७३.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. दिक्षा संभाजी साळुंके हिने ७० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला तर धनश्री आबा बोरगे हिने ६७.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविल्याची माहिती मुख्याध्यापक मधुकर सुपेकर यांनी दिली.

सारोळा सोमवंशी येथील न्यू इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाला ६६.६६ टक्के लागला आहे. यामधे दिशा दत्तात्रय आढाव हिने ७५.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. आयुष राजेंद्र आढाव याने ६४.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. ऐश्वर्या सखाराम सकट हिने ६३.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविल्याची माहिती मुख्याध्यापक अनिल आढाव यांनी दिली.

यशस्वी विदयार्थ्यांचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे, अहमदनगर जिल्हा खरेदी विक्री संघाचे संचालक अनिकेत शेळके, कुकडीचे उपाध्यक्ष विवेक पवार, श्रीगोंदा तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक संदिप सोनलकर व मच्छिंद्र वाळके, विलास दिवटे, शुभांगी सप्रे, अशोक ईश्वरे, सतिष धावडे, अनिल गव्हाणे, सोमनाथ वाखारे, सचिन कातोरे, सुधीर घेगडे, रविंद्र शिंदे, इंद्रभान खेडकर, संतोष ओहोळ, मोहन दळवी, मोहन हार्दे आदींनी अभिनंदन केले.

(पान १ वरून)

### ...तर विधानसभा निवडणूकीत सर्व जागा लढवू

किती तथ्य असते हे सगळ्यांना माहीत आहे. सरकारला माझ्या विरोधात काहीच सापडत नाही म्हणून ही केस ओपन झाली का, असा प्रश्न त्यांनी विचारला.

**जरांगे पाटील कोर्टात का आले? केस काय?**

जरांगेंच्या शिवबा संघटनेने २०१३ मध्ये एका नाटकाचे आयोजन केले होते. नाटकाच्या प्रयोगानंतर पैसे देण्यात आले नसल्याचा आरोप झाला होता. या प्रकरणात न्यायालयात खटला दाखल झाला. भारतीय दंड विधानाच्या कलम १५६ (३) नुसार कोथरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. न्यायालयाच्या आदेशावरून गुन्हा नोंदवण्यात आला होता. याच प्रकरणात पुणे न्यायालायाने त्यांच्या विरोधात वॉरंट काढले होते. त्यामुळे जरांगे आज न्यायालयात हजर राहिले. न्यायालयाने त्यांच्या विरोधातले अटक वॉरंट रद्द करत ५०० रुपयांचा दंड ठोठावला.

### मध्यप्रदेश काँग्रेसची निकालापूर्वीच जल्लोषाची तयारी !

दरम्यान, यावरून भाजपानेही काँग्रेसला टोला लगावला आहे. "पंतप्रधाननरेंद्र मोदीहे ४ जून रोजी पुन्हा एकदा पंतप्रधान होतील आणि मोदी सरकार तिसऱ्यांदा सत्तेवर येईल. काँग्रेसला त्याचा आनंद साजरा करायचा असेल तर त्यांचे स्वागत आहे. मोदींच्या नेतृत्त्वातीलभाजपासरकार ऐतिहासिक आणि प्रचंड बहुमताने विजयी होणार आहे, अशी प्रतिक्रिया मधप्रदेश भाजपाच्या मीडिया सेलचे प्रमुख आशिष अग्रवाल यांनी दिली.

SACCHIDANAND CAREER INSTITUTE
Parner Public School
G.M INTERNATIONAL SCHOOL PARNER
ADMISSIONS OPEN 2024-25
प्रवेश सुरू २०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science
[State Board & NCERT Syllabus]
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET
(Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET
(Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राउंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# भोयरे गांगर्ड्यात निर्जळी!

## महिलांचा ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा

सुपा : प्रतिनिधी

**भोयरे गांगर्डा गावात पाण्याची निर्जळी निर्माण झाल्याने संतप्त महिलांनी शुक्रवारी सकाळी आठ वाजता ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा काढून पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. पाणी न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. दरम्यान, कुकडी कालव्याला पाणी आल्याने पाण्याची समस्या दुर होईल असा विश्वास ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.**

भोयरे गांगर्डा गावासाठी पाडळी रांजणगांव येथील कुकडी कालव्याजवळ खोललेल्या विहीरीतून पाणी पुरवठा केला जातो. कालव्याचे आवर्तन सुरू आहे, तोपर्यंत पाण्याची टंचाई भासत नाही, मात्र आवर्तन बंद झाल्यानंतर पाणी पुरवठा करणारी विहीर कोरडी पडते. त्यानंतर पाण्यासाठी महिलांना भटकंती करावी लागते. असाच प्रसंग गेल्या काही दिवसांपासून अनुभवण्यास येत असल्याने संतप्त महिलांनी संघटीतपणे ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा नेत ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना जाब विचारला. ग्रामपंचायतकडून पाणी पट्टी, घरपट्टी नियमित वसुल केली जात असताना पाणी देण्याची जबाबदारी कोणाची असा संतप्त सवाल महिलांनी यावेळी उपस्थित केला. दरम्यान, कुकडी कालव्याचे आवर्तन सुटल्याने भोयरे गांगर्डा गावच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल असा विश्वास ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

आंदोलनात शोभा भिंगारदिवे, मीना लोणारे, हिराबाई पाडळे, अलकाबाई पाडळे, वैशाली पाडळे, अनिता पाडळे, सविता पाडळे, रेखाबाई पाडळे, झुंबरबाई पाडळे, सरस्वती पाडळे, अविनाश भिंगादिवे, संपत पाडळे, संजय पाडळे, देविदास पाडळे, विशाल पाडळे, गणेश गरदारे, प्रकाश भोगाडे, विलास गांगड, हरिष पाडळे, पांडूरंग लोणारे, लक्ष्मण कापरे यांच्यासह महिला व ग्रामस्थ सहभागी झाले होते.



भोयरे गांगर्डा येथे निर्जळी निर्माण झाल्याने महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा काढला.

### योजनेचे काम निकृष्ट

**भोयरे गांगर्डा गावासाठी साडेतीन कोटी रूपये खर्चाची जनजीवन योजनेअंतर्गत पाणी योजना मंजुर आहे. या योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. योजनेसाठी वापरण्यात आलेले पाईप निकृष्ट दर्जाचे असल्याने या योजनेचे भवितव्य काय असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. योजनेच्या वॉल साठी खोदण्यात आलेले खडडेही बुजविण्यात आलेले नाहीत. वाडया वस्त्यांवरील पाईपलाईनही अपुर्ण असल्याची तक्रार आहे.**

### वीजेअभावी खोळंबली योजना

**जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेली पाणी योजना पुर्ण झाली असून चाचणीही यशस्वी झाली आहे. मात्र या योजनेसाठी वीज वितरण कंपनीकडून वीज पुरवठा न करण्यात आल्याने ही योजना खोळंबली असल्याचे ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.**

# विश्वस्त पदाच्या निवडणूकीचा प्रचार शिगेला

## मळगंगा ट्रस्टची निवडणूक ■ रविवारी मतदान

निघोज : प्रतिनिधी

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या विश्वस्तपदासाठी येत्या २ जुन रोजी मतदान होणार असून निवडणूकीच्या रिंगणातील दोन्ही मंडळांचा प्रचार शिगेला पोहचला आहे. गेल्या ४२ वर्षात प्रथमच विश्वस्तपदासाठी मतदान होत असल्याने त्यात कोण बाजी मारणार याची निघोजकरांना उत्सुकता आहे.**



अनेक वर्षे ट्रस्टचे अध्यक्षपद भुषविणारे प्रभाकरशेठ कवाद व कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर लंके यांनी या निवडणूकीपासून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला असून त्यांची भुमीका निर्णायक ठरेल अशी चर्चा निघोज परीसरात आहे. काही आजी माजी विश्वस्तांना या निवडणूकीत डावलले गेल्याने ते निवडणूक प्रक्रियेपासून दुर आहेत.

विश्वस्तांची निवड नेहमीप्रमाणे बिनविरोध व्हावी यासाठी तरूण वर्ग आग्रही होता. मात्र अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी एकमेकांवर धावून जाणे, मागील राजकारणाचा उहापोह करून एकमेकांना दुषणे देणे असे प्रकार झाल्याने ही निवडणूक बिनविरोध होऊ शकली नाही.

या निवडणूकीत ट्रस्टचे उपाध्यक्ष शांताराम लंके, मा. सरपंच तथा निघोज फलोत्पादन सहकारी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत लामखडे, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद, मा. सरपंच ठकाराम लंके यांच्या नेतृत्वाखालील मळगंगा पॅनल तर संदीप पाटील जनसेवा फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन वराळ, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेश लाळगे, यांच्या नेतृत्वाखालील माऊली मळगंगा पॅनलमध्ये सरळ लढत होत आहे. मळगंगा पॅनलने सर्व २१ जागांवर तर माऊली मळगंगा परितवर्तन पॅनलने १४ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. येत्या २ जुन रोजी मतदान घेण्यात येऊन दुपारी चार नंतर मतमोजणी करण्यात येऊन निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

# अहिल्यादेवी होळकर हिंदू समाजाचे वैभव

## मोहन रोकडे यांचे प्रतिपादन | टाकळी ढोकेश्वरमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती


टाकळी ढोकेश्वर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी अनेक हिंदू मंदीरे व नदीघाटांचे बांधकाम केले. अहिल्यादेवी या खऱ्याअर्थान हिंदू समाजाचे वैभव असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते मोहनराव रोकडे यांनी केले.**

टाकळी ढोकेश्वर येथे अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी ढोकीचे युवा नेते कैलास नऱ्हे, सामाजिक कार्यकर्ते उद्योजक अशोक खराबी, संदीप खराबी, भास्कर निवडूंगे, प्रसिध्द बैलगाडा मालक अतुल धुमाळ, वीज वितरण कंपनीचे कर्मचारी पकज वतपाळ, अक्षय अल्हाट यांच्यासह टाकळीढोकेश्वर परीसरातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना रोकडे म्हणाले, लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी अहिल्यादेवींनी त्याकाळा औद्योगिक धोरण आखले. यावरून त्यांची दुरदृष्टी अधोरेखीत होते. त्या काळात स्त्री शिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडीलांनी त्याना लिहीण्यास, वाचण्यास शिकविले.

अहिल्यादेवींचा पराक्रम पाहून इंग्रजी लेखक लॉरेन्स यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गरेट यांच्याशी एकत्रीतपणे केली होती. ज्यावेळी जगातील सर्वात महान स्त्रियांचा इतिहास लिहीला जाईल त्या वेळेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्वात प्रथम लिहीले जाईल असे लेखक लॉरेन्स यांनी नमुद केले होते असे रोकडे म्हणाले.

अहिल्यादेवींनी प्रसिध्द हिंदू मंदीरांचा जिर्णोध्दार केला. अनेक मंदीरांच्या त्या आश्रयदात्या होत्या. अनेक तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी त्यांनी धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात व्दारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथचा समावेश असल्याचे रोकडे यांनी सांगितले.

# वाळवणे ग्रामपंचायतीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील वाळवणे येथील श्री भैरवनाथ विद्यालयातील इयत्ता दहावीमध्ये प्रथम तीन क्रमांक आलेले गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या माता - पित्यांचा वाळवणे ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यामध्ये भूमी अंधारे हीने ८८ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, पुनम विजय वाघमारे ८४.४० टक्के द्वितीय, अपर्णा अशोक दरेकर ८३ टक्के तृतीय तर ओमकार अविनाश थोरात याने एच एस सी मध्ये ७८ टक्के गुण मिळविले या सर्व विद्यार्थी व पालकांचा ग्रामपंचायतीच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.**

श्री भैरवनाथ विद्यालय वाळवणेचे मुख्यध्यापक श्री. पी.टी. दरेकर यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी सरपंच संगीता गोरक्षनाथ दरेकर, माजी सरपंच जयश्री सचिन पठारे, ग्रामपंचायत सदस्या वैशाली थोरात, ईश्वर शिंदे, रामदास काळे, संपत पठारे, तंटामुक्तीचे अध्यक्ष संतोष थोरात, ग्रामविकास अधिकारी औटी.एस.डी, माजी सरपंच उत्तम पठारे, माजी सरपंच कल्पनाताई थोरात, शाळेचे मुख्यध्यापक पी. टी. दरेकर, सेवा.सह.सो.मा.चेअरमन सुरेश दरेकर, सेवा.सह.सो सदस्य अशोक पठारे, रोकडे मेजर यांच्यासह महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निर्मलग्राम कळसमध्ये मुलींचाच डंका

## दहावीच्या परीक्षेचा शंभर टक्के निकाल



कळस : प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत निर्मलग्राम कळस येथील रयत शिक्षण संस्थेच्या विद्यालयात विद्यार्थीनींनी घवघवीत यश संपादन करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. वैष्णवी गोरक्ष गलांडे ९३.४० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला. विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागल्याची माहीती मुख्याध्यापक बी.आर. वमणे यांनी दिली.**

कळस विद्यालयाची दहावीच्या शंभर टक्के निकालाची परंपरा यंदाही कायम राखली गेली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशमध्ये शिक्षकांचा मोठा वाटा असून यापुढील काळातही विद्यालय आणि ग्रामस्थांच्या सहकार्यातून राबविण्यात येत असलेले शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. स्पोकन इंग्लिश कोर्स, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, दहावीच्या विद्यार्थ्यांना तज्ञ शिक्षकांच्या व्याख्यानमालेचे आयोजन आदी उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना परीपुर्ण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे माजी उपसरपंच तथा रयत शिक्षण संस्थेच्या स्थानिक स्कुल कमीटीचे सदस्य पांडूरंग बापूराव येवले यांनी सांगितले.

स्थानिक स्कुल कमिटीचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक बी. आर.वमणे, शिक्षक एस. जे.उदमले, ए.एस.जाधव, एस. टी. म्हस्के, टी एल शिंदे, विलास बेल्हेकर यांच्यासह पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### कळसचे टॉपर्स

**वैष्णवी पांडूरंग गाडगे ९२.८० टक्के, सृष्टी मच्छिंद्र पवार ९१.८० टक्के, सेजल विठठल गाडगे ९१.८० टक्के, विघ्नेश बाळू डोंगरे ८२.६० टक्के, सिध्दी पांडूरंग येवले ८०.८० टक्के**

# छत्रपती शिवाजी विद्यालयाचा १००टक्के निकाल

## निकिता शेंडकर पहिली



लोणीमावळा : प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत लोणीमावळा येथील भैरवनाथ शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला. निकिता विलास शेंडकर या विद्यार्थीनीने ९३.६० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकाविला.**

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे मुख्याध्यापक मच्छिंद्र राऊत, बाबाजी मावळे, बाबाजी मावळे, हरिभाऊ जाधव,संतोष झरेकर, बाबासाहेब दौंड, बाळू मापारी, रघुनाथ पवार, लहाणीबाई गुंड यांचे मार्गदर्शन लाभले. भैरवनाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नानाभाउ मावळे, सुभान खैरे, पोपट लाळगे, सरपंच मंगलताई विलास शेंडकर, गणेश मापारी, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन स्वप्निल मावळे, मा. चेअरमन संपतराव शेंडकर, उपसरपंच मोहन कामठे, पाणी वाटप संस्थेचे चेअरमन संतोष शेंडकर, माजी सरपंच अशोकराव शेळके, मा. उपसरपंच बाळासाहेब खैरे, राजेंद्र शेंडकर, पोपट कामठे, कैलास गोरडे, गंगाधर शेंडकर, विलास शेंडकर, गणीभाई पठाण, सावकार पडवळ, संस्थेचे सचिव नवनाथ शेंडकर, भाऊसाहेब पडवळ, संभाजी लाळगे, प्रवीण तुपे, भाउसाहेब शेळके यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


### लोणीमावळयाच्या टॉपर्स

**निकिता विलास शेंडकर ९३.६० टक्के, अस्मिता जयसिंग शेंडकर ९३.४० टक्के, तनिष्का देविदास मावळे ९०.४४टक्के. विद्यालयातील विद्यार्थीनींनी पहिले तीनही क्रमांक पटकावत आघाडी घेतली. तीनही विद्यार्थीनींचे लोणीमावळा व परीसरात कौतुक करण्यात येत आहे.**

# पारनेरची जिज्ञासा जिल्हयात दुसरी तर तालुक्यात पहिली

## पारनेरच्या न्यू इंग्लिश स्कुलचा ९७ टक्के निकाल





पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर शहरातील जिल्हा मराठा समाज संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कुलची जिज्ञासा सागर वैद्य या विद्यार्थीनीने इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९९ टक्के गुण मिळवून जिल्हयात दुसरा तर तालुक्यात पहिला क्रमांक मिळविला.**

मार्च २०२४ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत न्यू इंग्लिश स्कुलचे २१६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २१० विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मनिषा गाडगे, निर्मला सोबले, जुलेखा शो, शर्मिला मगर, मंगल बनकर, संतोष पारधी, जयवंत पुजारी, संगिता सोनवणे, लता वाल्हेकर, स्वाती म्हस्के, सुरज पांढरे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकांचा प्राचार्य बाळासाहेब करंजुले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

विद्यालयाच्या या यशाबददल संस्थेचे सचिव रामचंद्र दरे, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सहसचिव जयंतराव वाघ, खजिनदार ॲड दिपलक्ष्मी म्हसे, मा. आ. नंदकुमार झावरे, विश्वस्त सिताराम खिलारी, सदस्य भाउसाहेब खिलारी, प्राचार्य बाळासाहेब करंजुले, पर्यवेक्षक बाबासाहेब चौरे यांनी अभिनंदन केले.

### विद्यालयाची गुणवत्ता सिध्द

**जिज्ञासा वैद्य हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९९ टक्के गुण मिळवत जिल्हयात दुसरा तर तालुक्यात पहिला क्रमांक पटकावत विद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता सिध्द केली आहे. विद्यालयाच्या वतीने स्कॉलरशिप, एन एम एम एस आदी परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवून त्यातही चांगले यश संपादन केले आहे.**

**बाळासाहेब करंजुले, प्राचार्य**

### दृष्टीक्षेपात निकाल

**विद्यालयाचे ६३ विद्यार्थी विशेष योग्यता श्रेणीत, ९६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ४७ विद्यार्थी व्दितीय श्रेणीत तर ४ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. १२ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळविले.**

### न्यू इंग्लिश स्कुलचे टॉपर्स

**जिज्ञासा वैद्य ९९ टक्के, वेदांत शिंदे ९६.६० टक्के, श्‍ती सुंबे ९६ टक्के, प्रथमेश गोरे ९४.४० टक्के, ओम काजळे ९३.८०**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com